स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी
सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई संचालित महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालये : एक चिकित्सक अभ्यास (1863 – 2021)

संशोधक
भुजंग रामराव बोबडे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. ओमशिवा लिगाडे
एम. ए. एम. फिल. पीएच. डी.
शिवजागृती वरीष्ठ महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर

संशोधन केंद्र
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर जि. नांदेड

मार्च 2022

पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई संचालित महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालये – एक चिकित्सक अभ्यास (1863-2021)

प्रस्तावना

वस्तुसंग्रहालये ही केवळ प्रदर्शने न रहाता ती ज्ञानदालने बनली पाहिजेत.

आज जगभरात वस्तुसंग्रहालयांची एक नवी क्रेझ वाढत चाललेली दिसते. त्यामुळे सध्या आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय संस्थेचे (ICOM) 141 देशातील 40000 हून अधिक संग्रहालये व संग्रहालय तज्ञ हे सर्व एका नेटवर्क मध्ये जोडलेले दिसतात.

संग्रहालयाची सर्वसाधारण व सोपी व्याख्या म्हणजे जेथे मानव व निसर्ग या पैकी कोणत्याही एका वा दोन्हीच्या माहिती संबंधीच्या कोणत्याही प्रकारच्या साहित्याचे संकलन केलेले असते व इतरांना हा संग्रह पाहता यावा यासाठी त्यांची मांडणी अभ्यासपूर्ण रीतीने केलेली असते त्यास संग्रहालय / वस्तुसंग्रहालय असे म्हणतात. परंतु इथे एक महत्वपूर्ण बाब लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे केवळ संग्रह म्हणजेच संग्रहालय नव्हे कारण संग्रह हा जर आपल्या घरात कडी कपाटात बंद असेल, पेटी वा खोक्यांमध्ये भरून ठेवलेला असेल तर तो फक्त संग्रहच राहतो. जेंव्हा इतरांना हा संग्रह पाहता यावा यासाठी त्यांची मांडणी साहित्याच्या योग्य माहितीसह अभ्यासपूर्ण रीतीने केलेली असते तेंव्हाच त्यास संग्रहालय / वस्तुसंग्रहालय असे म्हणता येते.

२४ ऑगस्ट २००७ रोजी ICOM च्या ज्यास आपण यानंतर आयकॉम (आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय संस्था) असे म्हणू, तिच्या ऑस्ट्रिया देशातील व्हीयन्ना येथे झालेल्या २२ व्या आमसभेत संग्रहालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली – संग्रहालय ही एक नफेखोरी न करणारी एक कायस्वरूपी अशी संस्था जी लोकांसाठी खुली असते, जेथे साहित्याचे संकलन, जतन, संशोधन केले जाते तसेच भौतिक व अभौतिक रूपातील मानवतेचा ऐतिहासिक वारसा प्रदर्शित केलेला असतो ज्याचा उद्देश शैक्षणिक, अध्ययन व आनंद प्राप्तीचे वातावरण निर्माण करने हा आहे.[१]

विविध विषयांतर्गत दुर्मिळ व नावीन्यपूर्ण वस्तू आणि सामग्री यांचे परिरक्षण, जतन, संवर्धन, प्रदर्शन व अर्थबोधन करणारी एक संस्था म्हणजे संग्रहालय. (म्युझियम शब्दासाठी) वापरलेला मराठी प्रतिशब्द होय.[२]

एखाद्या विषयाशी संबंधित वस्तूंचा व्यवस्थितपणे संग्रह व प्रदर्शन करणारी संस्था म्हणजे संग्रहालय होय. काही संग्रहालयांत एकाहून अधिक विषयांशी संबंधित वस्तूही असतात. संग्रहालये ही वस्तू, शिल्प वगैरेंना असलेली ऐतिहासिक परंपरा, त्या वस्तूंच्या निर्माणकाळाची पुरातन संस्कृती व पार्श्वभूमी असा इतिहास जतन करण्यात मदत करतात. नानाविध वस्तूंचा संग्रह जिथे व्यवस्थितपणे ठेवलेला असतो अशा स्थानाला संग्रहालय किंवा 'वस्तू संग्रहालय' म्हणतात.[३]

संग्रहालय, कलादालन, या समाज शिक्षणासाठी निर्माण झालेल्या रचना आहेत. या ठिकाणी शिकू इच्छिणाऱ्यांचे शिक्षण तर होतेच, पण त्याबरोबर संग्रह वा प्रदर्शन पहायला येणाऱ्या व्यक्तीच्या माहितीत भर घालण्याचे व व्यक्तीची दृष्टी व्यापक करण्याचे कार्य कळत-नकळत होते. संग्रहालय हे समाज शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र आहे. कलादालनात एका विशिष्ट विषयापुरती, तात्पुरत्या स्वरूपात प्रदर्शनीय वस्तूंची मांडणी केलेली असते, तर संग्रहालयात ही मांडणी कायमची व रचनाबद्ध असते.[४]

वस्तुसंग्रहालय ज्यास इंग्रजीत म्युझियम हा शब्द वापरला जातो तो म्युझेस या पासून आला आहे. ग्रीक आणि रोमन पुराणकथांनुसार कला, विज्ञान, साहित्य यांच्या नऊ अधिष्ठात्री देवता मानल्या गेल्या आहेत, त्यांना 'म्युझेस' असे म्हटले जाते. असे मानले जाते की या ९ म्युझेस देवता म्हणजे कैलिओपे, क्लिओ, इंटरप, थालीया, मेलपोमीन, टार्सीकोर, इरैटो, पालीमिया व युरेनिया. ज्यांचा जन्म ओलम्प्स पर्वतराजीतील पिपरिया येथील देवाधिदेव जियस व माता देवी नेमोसिन यांच्या पोटी झाला होता.[५]

संग्रहालयाच्या या सर्व दिगज्ज व विद्वान व्यक्तींनी, जगप्रसिद्ध संस्थांनी केलेल्या व्याख्या पाहत असताना आपण एका अत्यंत महत्वाच्या बाबीकडे कायम दुर्लक्ष करीत आलो आहे ते म्हणजे – ही संग्रहालये ज्यांच्यासाठी बनविली जातात किंवा असे म्हणता येतील की संग्रहालयाचा सर्वात मोठा जो प्रेक्षक वर्ग असतो तो म्हणजे लहान मुले, ज्यांचा वयोगट हा साधारणत: १० ते २० वर्ष असा असतो. विदेशातून येणाऱ्या व्यक्तींपैकी ७०.८% लोक हे देखील भारतातील ऐतिहासिक इमारती, किल्ले, मंदिरे व संग्रहालये पाहण्यासाठी येत असतात.[६]

१८१४ साली भारतातील पहिले राष्ट्रीय संग्रहालय कोलकाता येथे स्थापन करण्यात आले त्यानंतर १८५१ साली शासकीय वस्तुसंग्रहालय, चेन्नईची स्थापना झाली. पुढे १८६३ मध्ये महाराष्ट्रातील सेंट्रल म्युझियम, नागपूर ची स्थापना झाली जे महाराष्ट्रातील पहिले शासकीय संग्रहालय असे म्हणता येईल.

समृद्ध ऐतिहासिक वारसा आणि पर्यटनाची राजधानी असणा-या आपल्या महाराष्ट्रात पुरातन वस्तुसंग्रहालये उभी राहिली. मात्र, प्रसिद्धी करण्यात आलेले अपयश, नियोजनाचा अभाव, दिशादर्शक फलक व इतर आवश्यक सोयीसुविधांची कमतरता आणि या विषयाबद्दलची अद्यापही अनिश्चित असलेली शासकीय धोरणे यामुळे या संग्रहालयांना पर्यटक क्वचितच भेट देतात. महाराष्ट्रातील शंभरच्या वर असणारी खाजगी संग्रहालये व १३ शासकीय संग्रहालये याबद्दलचे योग्य नियोजन करून संग्रहालयांना जोडणारे 'म्युझियम सर्किट' तयार करणे गरजेचे आहे. त्यातूनच पर्यटक आणि संशोधकांचा ओघ वाढेल आणि त्यातून मिळणाऱ्या चलनातून संग्रहालयांनाही कांही आर्थिक सहकार्य मिळेल. आजच्या तारखेला तरी महाराष्ट्रा सारख्या शैक्षणिक दृष्ट्या प्रगत राज्यात वस्तुसंग्रहालय शास्त्राची पदवी, पदविका देणारे एकही महाविद्यालय वा विद्यापीठ नाही त्यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना बडोदा वा दिल्ली सारख्या ठिकाणी जावे लागते ही निश्चितच भूषणावह बाब नाही. त्यासाठी शैक्षणिक स्तरावर जागृती निर्माण करण्याची मोठी आवश्यकता आहे.

मा. डॉ. तेजस गर्गे यांच्या मतानुसार महाराष्ट्र शासनाअंतर्गत असणाऱ्या वस्तुसंग्रहालयांमध्ये केंद्र-ब्रिटिश सरकारकडून हस्तांतरित, संस्थानिकांकडून हस्तांतरित, खाजगी संग्रहाकांकडून हस्तांतरित व शासन धोरण म्हणून स्थापन झालेले प्रादेशिक संग्रहालय असे चार प्रमुख वर्ग दिसून येतात.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश महाराष्ट्रातील शासकीय संग्रहालयांच्या इतिहासाबरोबरच आधुनिक काळातील शासकीय संग्रहालयांची भूमिका व उपयोगिता याबाबत चिकित्सा करणे हाही आहे.

विषयाची निवड

मागील 14 वर्षापासून मी संग्रहालयशास्त्राचा एक विद्यार्थी, संग्रहालय समन्वयक, एका आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचा क्युरेटर व सध्या हैद्राबाद येथील याच विभागाचा संचालक या पदावर कार्य करत आहे. या कार्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील, देशभरातील व भारताबाहेरील अनेक वस्तुसंग्रहालये पाहण्याची, अभ्यासण्याची संधी मिळाली. तसेच केवळ १.५ लाख रुपये ते १३० कोटी रुपये खर्चाच्या, विविध विषयांवरील पारंपारिक ते अत्याधुनिक अशा १२ संग्रहालयांच्या निर्मितीत प्रत्यक्ष काम करता आले.

एखादे संग्रहालय पाहिल्यानंतर त्या संग्रहालयाची वास्तु, संग्रहालयातील महत्वाचे ऐतिहासिक साहित्य, त्यांची प्रदर्शनशैली, सामान्य नागरिक व अभ्यासक यांना मिळणाऱ्या सेवा, संशोधन कार्यासाठीच्या सुविधा, संग्रहालयाचे प्रशासन व त्यांच्या समस्या या बाबी कुतुहलाने पाहण्याची सवय लागली. तसेच या सर्व बाबतीतील खाजगी संग्रहालये व शासकीय संग्रहालये यातील फरक जाणवत राहिला. २०१९ मध्ये अमेरिकेत असताना तेथील शासकीय संग्रहालये, त्यांच्या कामाची पद्धती जेंव्हा पाहिली तेंव्हा हे जाणवले की आपणाला किमान आपल्या राज्यातील शासकीय संग्रहालयातील ऐतिहासिक साहित्याचे महत्व, त्याची माहिती व प्रसिद्धी करता आली पाहिजे, त्या बाबतचे छोटे छोटे कोर्सेस जे सहजपणे कोणालाही शिकता येऊ शकतील असे डिझाईन केले पाहिजेत ही भावना दृढ झाली. आणि यातुनच कांही संशोधन लेख व ग्रंथ प्रकाशित केले तसेच संग्रहालय शास्त्रासंबंधीच्या विविध कोर्सेसची सुरुवात केली. परंतु या विषयाचे समग्र आकलन व्हायचे असेल व त्याचे उपयोजन व्हावे असे वाटत असेल तर त्या बद्दल अधिक सखोल संशोधन व्हायला हवे, संग्रहालये ही अधिकाधिक लोकाभिमुख व संशोधनग्राही व्ह्यायला हवीत, ज्या प्रमाणे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या सारख्या विज्ञान विषयांसाठी शाळा-महाविद्यालयात प्रॅक्टिकल लॅबोरेटरी असतात त्या प्रमाणे इतिहास, भूगोल, नागरीकशास्त्र, समाजशास्त्र, महाविद्यालय स्तरावर पुरातत्वशास्त्र, संरक्षणशास्त्र, आयुर्वेद इ. विषयांसाठी संग्रहालये ही देखील एक प्रकारची प्रयोगशाळाच आहेत परंतु त्या अनुषंगाने अद्यापही आपल्या देशात विचार केला जात नाही. उपरोक्त विषयांना सोडून आपल्या शाळा-महाविद्यालयात मानववंशशास्त्र, नाणकशास्त्र, अभिलेखशास्त्र, पुराभिलेखशास्त्र / हस्तलिखितशास्त्र, डिजिटल हेरीटेज यासारखे नवीन विषय देखील स्थानिक / सहयोगी संग्रहालयांच्या मदतीने सुरू करता येतील ही जाणीव सातत्याने होत होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या ICOM, Smithsonian Institute, नॅशनल म्युझियम रिसर्च इन्स्टिट्यूट दिल्ली, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई या सारख्या संस्था तसेच वैयक्तिक स्तरावर महाराष्ट्रातील मा. श्री. राजा केळकर, पद्मश्री डॉ. सदाशिव गोरक्षकर सर, डॉ. तेजस गर्गे सर, आंध्र प्रदेशातील डॉ. व्ही. व्ही. कृष्णशास्त्री सर, डॉ. इ. शिवनागी रेड्डी सर हे या क्षेत्रातील आदर्श डोळ्यासमोर होतेच, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालण्याचा एक छोटासा प्रयत्न या संशोधनातून करत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे माझे महाविद्यालयीन शिक्षणापासूनचे गुरु डॉ. ओमशिवा लिगाडे सर यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे मी या विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालयांचा प्रारंभ आणि विकास कसा झाला याचा अभ्यास करणे व कालक्रमानुसार त्याची व्यवस्थित मांडणी करणे.
२. महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांची व त्यातील ऐतिहासिक संग्रहाच्या माहितीचे डॉक्युमेंटेशन करणे.
३. महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे/साहित्यांचे विश्लेषण व त्याचे स्थानिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय इतिहास लेखनातील महत्व स्पष्ट करणे.
४. आपल्या सर्वांनाच शासकीय वस्तुसंग्रहालयांकडून खूप साऱ्या अपेक्षा असतात, परंतु शासकीय वस्तुसंग्रहालयांचे दैनंदिन कामकाज चालविताना येणाऱ्या अडचणी, त्यातूनही पुढे जाण्यासाठी संग्रहालय प्रशासन करीत असलेले प्रयत्न सर्वांसमोर आणणे.

५. मागील १४ वर्षात मला स्वत:ला संग्रहालय निर्माण करत असताना आलेले अनुभव, जगभरात वस्तुसंग्रहालयांच्या आधुनिकीकरणासाठी चाललेले प्रयत्न यांचा अभ्यास करता आला त्याचा उपयोग आपल्या महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांसाठी करता येतो का हे पाहणे.

संशोधन विषयाचे महत्व व उपयुक्तता

१. या संशोधनामुळे महाराष्ट्रातील सध्य स्थितीत असलेल्या जवळपास सर्व महत्वपूर्ण शासकीय वस्तुसंग्रहालयांची कालक्रमानुसार माहिती अभ्यासकांना, संशोधकाना मिळेल.
२. महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे महत्व, अध्ययनाच्या दृष्टीने संग्रहालयातील विशेष (युनिक) बाबी स्पष्ट झाल्या तर अधिकाधिक संशोधक व अभ्यासक विद्यार्थी त्याकडे गांभीर्याने लक्ष देतील. तसेच हे साहित्य केवळ इतिहास विषयाच्या अभ्यासकांनाच उपयुक्त नसून इतरही विषयांसाठी कसे उपयुक्त आहे हे सर्वांच्या लक्षात येईल.
३. आपल्या राज्याचा व देशाचा सांस्कृतिक वारसा केंद्रे असणाऱ्या संग्रहालयांच्या बाबतीत सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून राजकीय स्तरावरही याचे महत्व लक्षात आणून देणे शक्य होईल.
४. संग्रहालयातील कुशल मनुष्यबळ जे सध्या अत्यंत अपुरे आहे त्याच्या पूर्ततेसाठी उपाययोजना करता येतील.
५. महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांना महाराष्ट्रातील, देशभरातील व भारताबाहेरील ज्या ज्या संग्रहालयात उत्कृष्ट पद्धतीने (Best Practices) कार्य चालले आहे त्याच्या तुलनेत आपण कोठे आहोत व आपणाला अजून उत्तम कार्य कश्या पद्धतीने करता येईल हे ठरविणे सोपे जाईल.
६. आधुनिकतेचे महत्व ओळखलेल्या या संग्रहालयांना विविध उद्योगसमुहांचे सामाजिक उत्तरदायित्व निधी, अशासकीय प्रकल्प यातून कांही सहाय्य करता येईल.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांसंबंधीचा या प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती ही महाराष्ट्र राज्य, त्यातही केवळ शासकीय संग्रहालये इतकी मर्यादित आहे. तसेच यात केवळ पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई संचलित संग्रहालये यासाठी घेतलेली असून या व्यतिरिक्त महाराष्ट्रात असलेली भारतीय नौदल, वायुसेना, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, रेल्वे प्रशासन यांच्या संग्रहालयांचा यात समावेश नाही.

कालमानानुसार पट पाहिला तर तो इ. स. 1883 पासून अद्यापपर्यंत चा म्हणजे साधारण 140 वर्षाचा हा कालखंड आहे. परंतु ही सर्व शासकीय संग्रहालये असल्यामुळे मिळणा-या माहितीची मर्यादा, त्याचे विश्लेषण व तुलनात्मक अध्ययन करून मांडल्या जाणाऱ्या उपाययोजना प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्ती तसेच उपलब्ध निधी या सर्व बाबी देखील तितक्याच महत्वपूर्ण आहेत परंतु ते सर्व केवळ संशोधन व संशोधकाकडून होण्याच्या शक्यतेवर मर्यादा येते. डिजिटल जगात सातत्याने होत जाणारे नित्यनुतन बदल व ते स्वीकारण्याची तत्काळ न स्वीकारण्याची जुन्या पिढीची मानसिकता यामुळे शासकीय व खाजगी संग्रहालये यात फरक दिसतच राहतील. त्यामुळे मानसिकता बदलण्याचे मोठे आव्हान या संशोधनापुढे व संशोधकापुढे असेल व हीच खऱ्या अर्थाने या संशोधनाची मर्यादा असेल.

संशोधन विषयाची गृहीतके

१. सर्वच शासकीय संग्रहालयांची माहिती कालक्रमानुसार आढळून येत नाही.
२. कांही शासकीय वस्तुसंग्रहालयांमधील वस्तु, ऐतिहासिक कागदपत्रे यांची मांडणी योग्यरीतीने झालेली दिसून येत नाही.
३. तेर (जि. उस्मानाबाद) सारख्या ग्रामीण भागातील संग्रहालयांनीही आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली आहे.
४. इतिहास विषयाच्या अभ्यासाव्यतिरिक्त इतर विषयाच्या अभ्यासासाठी वस्तुसंग्रहालये पूरक म्हणून कार्य करतात.
५. वस्तुसंग्रहालये केवळ मनोरंजनाचे साधन नसून तो एक संशोधनाचा व शैक्षणिक उपयोगितेचा विषय आहे.
६. वस्तुसंग्रहालयांच्या जतन व सवंर्धनासाठी शासनाबरोबरच सामाजिक संस्थांनी, इतिहास अभ्यासकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

संशोधन पद्धती

या संशोधन प्रबंधाच्या लेखनासाठी पुढील संशोधन पद्धतींचा अबलंब करण्यात येईल.

१. **संदर्भ साधन लेखन पद्धती -** अत्यंत विद्वान अशा व्यक्तींनी या विषयावर केलेल्या सर्व पुर्व संशोधनातून महत्वाचे संदर्भ शोधुन त्यांची योग्यपणे मांडणी केली जाईल.

२. **क्षेत्रभेट लेखन पद्धती -** सर्व शासकीय वस्तुसंग्रहालयांना, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, प्रादेशिक कार्यालये यांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती घेतली जाईल.

३. ज्या ज्या वस्तुसंग्रहालयांमध्ये उत्कृष्ट कार्य चालेले आहे अशा इतरही कांही शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी वस्तुसंग्रहालयांना भेट देऊन त्यांच्याही कार्याची माहिती घेतली जाईल व त्याचा उपयोग शासकीय वस्तुसंग्रहालयांना कसा करता येईल व संशोधकांना, अभ्यासकांना याचा अधिकाधिक लाभ कसा होऊ शकेल या अनुषंगाने लेखन केले जाईल.

पूर्व संशोधनाचा आढावा

या विषयावर आत्तापर्यंत मराठी विश्वकोशात महाराष्ट्रांतील महत्त्वाची काही संग्रहालये अशी छोटीशी पण उपयुक्त माहिती आलेली आहे. त्यानंतर 'संग्रहालये- बदलती भूमिका, बदलते रूप' या शिर्षकाचा एक महत्वपूर्ण लेख डॉ. तेजस मदन गर्गे, संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांनी १८ मे या आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिनाच्या निमित्ताने १२ मे २०१९ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात प्रकाशित केला होता. मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विषयाच्या पेपर क्रमांक ६ मध्ये ऑप्शनल म्हणून ठेवण्यात आलेल्या पुरातत्वशास्त्र, वस्तुसंग्रहालयशास्त्र आणि ग्रंथालयशास्त्र या विषयाच्या क्रमिक पुस्तिकेत देखील संग्रहालयांची वाटचाल, संग्रहालयातील जतन संवर्धनाचे कार्य यांची माहिती देण्यात

आलेली आहे. याचे लेखन डॉ. अनुराधा रानडे व डॉ. सपना समेळ यांनी केलेले आहे. याच बरोबर महाराष्ट्रातील इतरही कांही विद्यापीठाच्या क्रमिक पुस्तकांसाठी कांही मान्यवर लेखकांनी या विषयाबद्दल अभ्यासक्रमानुसार लेखन केलेले आहे.

भारतातील संग्रहालय क्षेत्राबद्दल डॉ. ओ. पी. अग्रवाल, उषा अग्रवाल, डी. गणेशन, सी. शिवराममूर्ती अशा विद्वान व्यक्तींनी संशोधन प्रसिद्ध केलेले आहे. ज्यात सी. शिवराममूर्ती यांचे Museums in India हे लेखन प्रसिद्ध आहे. पुणे येथील लेखिका डॉ. मंदा खांडगे यांनी पुण्यातील संग्रहालये नावाचे एक सुंदर पुस्तक प्रकाशित केलेले आहे. बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठात An Analytical Study of Administrative and Curatorial Problems of Government Museums in Gujarat हा शोध प्रबंध सौ. रश्मिका धुमाळ यांनी 2012 मध्ये सादर केला होता ज्यात त्यांनी गुजरात मधील शासकीय संग्रहालयात प्रशासकीय व अभिरक्षणाच्या कार्यात ज्या समस्या येतात त्याबद्दल संशोधनपूर्ण लेखन केलेले आहे.

प्रकरण योजना

प्रकरण 1 – वस्तुसंग्रहालयांची पार्श्वभूमी – अर्थ, स्वरूप, व्याप्ती, प्रकार व उदय

या प्रकरणात संग्रह, वस्तुसंग्रहालय म्हणजे काय, वस्तुसंग्रहालयशास्त्र म्हणजे काय, त्यांचे स्वरूप कशा प्रकारचे असते, संग्रहालयांच्या कार्याची व्याप्ती ही तिच्या नावाप्रमाणे / थीम प्रमाणे कशी बदलत जाते, संग्रहालयाला मिळणारे अनुदान, प्रशासन यावरून तसेच संग्रहालयातील विशिष्ट प्रकारच्या साहित्यावरून संग्रहालयांचे कोणकोणते प्रकार असतात, जगभरातील संग्रहालयांची सुरुवात कधी झाली या सर्व बाबींबद्दलचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण 2 – महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालयांचा प्रारंभ आणि विकास

भारतात संग्रहालय स्थापनेची सुरुवात सर विल्यम जोन्स यांच्या पुढाकाराने स्थापित 'एशियाटिक सोसायटी'पासून झाली. १८१४ साली कलकत्ता एंपिरियल म्युझियम म्हणून ओळखले जाणारे संग्रहालय आता 'इंडियन म्युझियम' या नावाने ओळखले जाते. त्यानंतर **१८५५ मध्ये व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालय, मुंबई हे स्थापन करण्यात आले जे आता डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय** या नावाने ओळखले जाते. यापुढे १८५७ पर्यंत भारतात १०-१२ संग्रहालये सुरू झाली. सरकारी संग्रहालय (त्रिवेंद्रम १८५७), म्हैसूर सरकारी संग्रहालय (बंगलोर १८६६) आणि सरकारी केंद्रीय संग्रहालय (जयपूर १८७६) ही तीन प्रेक्षणीय संग्रहालये स्थापन झाली. **१८८३ मध्ये 'अॅन्टेक्वेरियन सोसायटी ऑफ सेंट्रल प्रोव्हिनन्स' या संस्थेच्या शिफारशीने नागपूर येथे 'सेंट्रल म्युझियम' म्हणजेच मध्यवर्ती संग्रहालय स्थापन झाले.** महाराष्ट्राचा विचार करता राज्यातील हे सर्वात जुने शासकीय संग्रहालय ठरते. त्यानंतर १० जानेवारी १९२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई या संग्रहालयाची स्थापना झाली. १९१० साली पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळाची तर १९३१ साली राजवाडे इतिहास संशोधन मंडळ या संस्थेची धुळे येथे स्थापना झाली ज्यांनी पुढे आपल्याकडे असलेल्या दुर्मिळ ऐतिहासिक साहित्यांची संग्रहालये अभ्यासकांसाठी खुली केली.

या प्रकरणात महाराष्ट्रातील अशा सर्व महत्वपूर्ण वस्तुसंग्रहालयांचा प्रारंभ आणि विकास कसा झाला याबाबत आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 3 – महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे/साहित्यांचे विश्लेषण व इतिहासातील महत्व

या प्रकरणात महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालये, त्यातील सर्व महत्वपूर्ण साहित्य ज्याची थोडक्यात यादी पुढीलप्रमाणे दिलेली आहे आणि ज्यात वेळोवेळी नव्याने भर पडत जात आहे त्यांचे विश्लेषण केले जाईल व त्याचे इतिहास अभ्यासकांसाठी असलेले महत्व अधोरेखित केले जाईल.

१. मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर - स्थापना ७ मे १८६३, प्रदर्शनीय वस्तूंची संख्या २८,८८७.
२. प्रादेशिक संग्रहालय, सरकारवाडा, नाशिक – स्थापना ११ ऑक्टोबर १९८५, प्रदर्शनीय वस्तू १,३४८
३. प्रादेशिक संग्रहालय, सिंदखेडराजा जि. बुलढाणा – स्थापना १९८६, प्रदर्शनीय वस्तू २५४
४. प्रादेशिक संग्रहालय, सोनेरी महल, औरंगाबाद - स्थापना २० एप्रिल १९७९, प्रदर्शनीय वस्तूंची संख्या १,०५१.
५. टाऊन हॉल म्युझियम, कोल्हापूर - स्थापना ३० जानेवारी १९४६. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या १,४६९.
६. चंद्रकांत मांढरे चित्रसंग्रहालय, कोल्हापूर – स्थापना १० मार्च १९८७, प्रदर्शनीय वस्तूंची संख्या ४९६.
७. श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा - स्थापना वर्ष १९६६. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या १,४९२.
८. श्री भवानी चित्र-संग्रहालय व ग्रंथालय, औंध, जि. सातारा - स्थापना १२ जुलै १९३८. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या ५,०५२.
९. सांगली वस्तुसंग्रहालय, पटवर्धन वाडा, सांगली - स्थापना ९ जानेवारी १९५४. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या ९३०.
१०. थिबा पॅलेस वस्तुसंग्रहालय, रत्नागिरी – स्थापना १ मे १९९८, १४५ प्रदर्शनीय वस्तू तसेच संपूर्ण राजवाडा हाच एक वास्तुशैलीचा उत्कृष्ट नमूना असणारे संग्रहालय आहे.
११. श्री रामलिंगअप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय, तेर जि. उस्मानाबाद - स्थापना वर्ष १९६७. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या २४,७३९.
१२. श्री बाळासाहेब पाटील वस्तुसंग्रहालय, पैठण जि. औरंगाबाद – स्थापना वर्ष १९९७, प्रदर्शनीय वस्तूंची संख्या २,०४७
१३. माहुर संग्रहालय, माहुर जि. नांदेड - स्थापना वर्ष १९८४. प्रदर्शनीय वस्तूंची संख्या १,२५१.

प्रकरण 4 – महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांचे प्रशासन व व्यवस्थापन

जगातील बहुसंख्य संग्रहालयांना आर्थिक नियोजनासाठी त्या त्या देशातील शासनावर अवलंबून रहावे लागते. खाजगी संग्रहालयांना त्यांच्या आयोजकांकडून मदत मिळते. संग्रहालये कितीही भव्य आणि व्यापक असली, तरी तेथील प्रशासनाला ती नेहमी अपूर्णच वाटतात याचे मुख्य कारण म्हणजे त्यात सातत्याने वस्तूंची पडत जाणारी भर. देशातील सार्वजनिक संस्था, महापालिका, नगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्था व श्रीमंत नागरिक संग्रहालयांना प्रासंगिक मदत करतात, देणग्या देतात. संग्रहालयांना अशा प्रकारची आर्थिक व वस्तूंची देणगी मिळविणे, हे आर्थिक अडचणीवर मात करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे परंतु हे दरवेळी शक्यच होते असेही नाही.

संग्रहालयाची दोन महत्त्वाची कामे म्हणजे वस्तू वा सामग्रीचे परिरक्षण–जतन व पुन:स्थापना होय. यांकरिता तज्ज्ञांच्या ज्ञानाची व कौशल्याची नितांत गरज असते. हे कुशल मनुष्यबळ सध्या अत्यंत अपुरे आहे याची कारणे काय आहेत आणि अशी उणीव असतानाही महाराष्ट्रातील या १३ शासकीय वस्तुसंग्रहालयांचे प्रशासन व व्यवस्थापन कशा प्रकारे चालते याचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण 5 - महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालये व इतर संग्रहालये यांचे बदलते स्वरूप

सुरुवातीच्या काळात सर्वच वस्तुसंग्रहालये ही अनेक वर्षे केवळ एक प्रदर्शनीय स्थळ अशा भूमिकेत राहिलेले आहेत. जेथे केवळ ऐतिहासिक साहित्याचे संकलन व प्रदर्शन होत राहिले. परंतु कालांतराने त्यात बदल होत गेले, हे बदल संग्रहालयातील साहित्याचे अत्याधुनिक प्रकारे केले जाणारे प्रदर्शन इतकेच मर्यादित न राहता विविध प्रकारच्या ऐतिहासिक व संग्राह्य साहित्याचे जतन, संवर्धन, संगणकीकरण, डिजिटायजेशन या सर्वच क्षेत्रात होत गेले. तसेच लोक संग्रहालयाला भेट देण्यासाठी येतील न येतील परंतु आपण लोकांपर्यंत पोहचले पाहिजे या उद्दिष्टाने तात्पुरती प्रदर्शने व फिरती संग्रहालये, विविध प्रसंगांच्या निमित्ताने विशेष प्रदर्शने आयोजित करण्याचे कार्यही सुरू झाले. उदा. दरवर्षी 18 मे या आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिनाच्या निमित्ताने मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर सह जवळपास सर्वच महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयात कांही विशेष कार्यक्रमांचे आयोजन मागील कांही वर्षापासून केले जात आहे. तसेच या शासकीय वस्तुसंग्रहालयातील साहित्याचे डिजिटायझेशनचे कार्यही प्रगतीपथावर आहे. सामाजिक स्वयंसेवी संघटना व व्यक्तींच्या माध्यमातून पुरातत्वीय स्थळांचे जतन व संवर्धनाचे कार्य जे नुकतेच सुरू झाले आहे तसेच काम शासकीय वस्तुसंग्रहालयात सुद्धा सुरू करण्यात येईल.

या व्यतिरिक्त एक महत्वाची बाब म्हणजे संग्रहालयांची शैक्षणिक क्षेत्रातील जी भूमिका आहे तिच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालये व परिसरातील महत्वपूर्ण शैक्षणिक संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्याचा स्तुत्य प्रयत्न झालेला आहे परंतु तिचा विस्तार केवळ मुंबई पुरताच न राहता तो संपूर्ण राज्यात कसा उपयोगात आणला जाईल याबद्दल विचार झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई, गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव अशा अनेक खाजगी संग्रहालयांनी यादृष्टीने अनेक पावले आधीच उचललेली आहेत.

अशा सर्व महत्वपूर्ण व आवश्यक त्या बदलांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण 6 – निष्कर्ष

वरील सर्व प्रकरणांचा अभ्यास करून येणारे निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येतील.

संदर्भ:

1. https://icom.museum/en/resources/standards-guidelines/museum-definition/
2. https://vishwakosh.marathi.gov.in/33988/
3. https://mr.wikipedia.org/wiki/संग्रहालय
4. https://mr.wikipedia.org/wiki/संग्रहालय
5. सिंह, अरविंद कुमार, संग्रहालय विज्ञान, मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल, 2003, पृष्ठ क्र. १
6. https://chainomad.com/why-is-india-a-popular-tourist-destination/

संदर्भसूची:

1. Agarwal, Usha, Directory of Museums in India, New Delhi, 2000
2. Flower, Sir William Henery, Essays on Museums, Macmillan And Co. Limited, London, 1898
3. Hendley, Thomas Holbein, Handbook to the Jeypore Museum, Calcutta Central Press Company Limited, Calcutta, 1895
4. Jeyaraj, Dr. V., Museology Heritage Management, Director of Museums, Government Museum, 2005
5. Murray, David, Museums Their History and Their Use, Vol. I, James Maclehose & Sons, Glasgow, 1904
6. श्रीवास्तव, आलोक (संपादक), पुरातत्व अधिनियम एवं नियम, पुरातत्व, अभिलेखागार एवं संग्रहालय संचालनालय, मध्यप्रदेश, 1998
7. शुक्ल, डॉ. गिरीशचन्द्र, संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, 2002
8. गणेशन, डी., भारत के विविध संग्रहालय, पिलग्रिम्स प्रकाशन, वाराणसी, 2006
9. सहाय, शिवस्वरूप, संग्रहालय की ओर, मोतीलाल बनारसीदास, वाराणसी, द्वितीय संस्करण, 2005
10. अग्रवाल, ओ. पी., कला-वस्तु आणि ग्रंथालय साहित्याचे जतन, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, 2012
11. सार्धशती कौमुदी, शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ग्रंथ, मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर, सन 1863 ते 2013

संशोधक
भुजंग रामराव बोबडे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. ओमशिवा लिगाडे